## MAHARASHTRA ACT No. LI OF 1977

THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS (POSTPONEMENT OF ELECTIONS, DUE TO ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY, ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS) ACT, 1977

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ नोव्हेंबर १९७७ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोत्रे,**
अपर सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. LI OF 1977

AN ACT TO PROVIDE FOR FURTHER POSTPONEMENT OF ELECTIONS TO CERTAIN VILLAGE PANCHAYATS FOR A SHORT PERIOD ON ACCOUNT OF ENSUING GENERAL ELECTIONS TO THE STATE LEGISLATIVE ASSEMBLY, ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १६ नोव्हेंबर १९७७ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१

**यानंतर लवकरच घेण्यात यावयाच्या राज्य विधानसभेच्या, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता, विवक्षित ग्रामपंचायतींच्या निवडणुका थोड्या कालावधीकरिता आणखी लांबणीवर टाकण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम**

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र ग्रामपंचायती (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ अन्वये विवक्षित ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या होत्या ; परंतु, आणीबाणी मागे घेण्यात आल्यामुळे तो अधिनियम फक्त २० सप्टेंबर १९७७ ही तारीख धरून केवळ त्या तारखेपर्यंतच अंमलात राहणार होता, आणि त्या अधिनियमान्वये ज्यांचा पदावधी वाढविण्यात आला होता अशा विद्यमान पंचायतींच्या जागी नवीन पंचायतींची स्थापना करण्यासाठी निवडणुका घेणे आवश्यक होते ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानुसार सुमारे १०,५५० पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका नजिकच्या भविष्यकाळात घेण्यात यावयाच्या होत्या ;

**आणि ज्याअर्थी,** पंचायतींच्या निवडणुकांसाठी ठेवलेल्या मतदारांच्या यादीसाठी, महाराष्ट्र विधानसभेच्या मतदारांची यादी ही आधारभूत मानलेली आहे, तसेच विधानसभेच्या मतदार यादीत सुधारणा करणे चालू होते, तसेच त्यामध्ये ज्यांचे वय १ जानेवारी १९७७ रोजी पूर्ण २१ वर्षे झालेले असेल, अशा व्यक्तींची नावे समाविष्ट करणे चालू होते आणि हे सुधारणा करण्याचे काम ऑक्टोबर १९७७ च्या अखेरपर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा होती ;

आणि ज्याअर्थी, विधानसभेच्या मतदारांची सुधारित यादी उपलब्ध झाल्यानंतरच, पंचायतींच्या निवडणुकांसाठी मतदारांची अद्ययावत यादी आणि प्रभाग (वॉर्ड) इत्यादी निश्चित करणे शक्य होईल ;

आणि ज्याअर्थी, यानंतर लवकरच घेण्यात यावयाच्या राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी पूर्वतयारी करण्यात जिल्हाधिकारी आणि इतर अधिकारी गुंतलेले असतील ;

आणि ज्याअर्थी, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका (ज्यांच्या कार्यपद्धतीत बदल करण्यात आला आहे) ह्या, विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांबरोबरच किंवा त्यानंतर लगेच घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकाऱ्यांना, त्यांचे इतर काम विस्कळीत न होऊ देता, आवश्यक तो कर्मचारीवर्ग देऊ करण्यासाठी आणि त्यांना निरनिराळ्या ठिकाणी पाठविण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे आणि एकापाठोपाठ होणाऱ्या ह्या निवडणुकांसाठी इतर उपाययोजना करणे आणि संबंधित उमेदवारांची आणि मतदारांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची खात्री करून घेता येणे शक्य होईल अशा रीतीने या सर्व निवडणुकांचा कार्यक्रम आखावा लागणार आहे ;

आणि ज्याअर्थी, वर नमूद केलेल्या कारणांसाठी, पंचायतींच्या निवडणुका ३१ मे १९७८ हा दिवस धरून, त्या दिवसापर्यंत असणाऱ्या अल्प कालावधीपर्यंत आणखी लांबणीवर टाकण्यासाठी आणि परिणामी संबंधित पंचायतींचे विद्यमान सदस्य व प्रशासक यांचा पदावधी वाढविण्यासाठी आणि इतर संबंधित गोष्टींसाठी तरतूद करणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, पूर्वोक्तप्रमाणे निवडणुका लांबणीवर टाकणे व पदावधी वाढविणे यांसाठी व त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाल्याने त्यांनी, महाराष्ट्र ग्रामपंचायती (यानंतर लवकरच घेण्यात यावयाच्या राज्य विधानसभेच्या, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७७ हा ६ सप्टेंबर १९७७ रोजी प्रख्यापित केला होता ; (सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, आता, भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.** १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ग्रामपंचायती (यानंतर लवकरच घेण्यात यावयाच्या राज्य विधानसभेच्या, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७७ असे म्हणता येईल.

(२) तो ६ सप्टेंबर १९७७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो ३१ मे १९७८ ही तारीख धरून, त्या तारखेपर्यंत किंवा राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचित करील अशा आधीच्या तारखेपर्यंत अंमलात राहील आणि त्यानंतर समाप्त होईल. या अधिनियमाच्या समाप्तीनंतर, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, जणू काही तो (अधिनियम) महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित करण्यात आला असल्याप्रमाणे लागू होईल. (सन १९०४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १.)

**व्याख्या.** २. संदर्भानुसार अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "प्रशासक" म्हणजे, पंचायत अधिनियमाच्या कलम १६०, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये नियुक्त केलेला प्रशासक आणि त्यात त्या अधिनियमाच्या कलम १४५, पोट-कलम (२), खंड (ब) अन्वये किंवा कलम १५१, पोट-कलम (१), खंड (अ) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ब) "पंचायतीची निवडणूक" म्हणजे, पंचायतीच्या सदस्याची निवडणूक, परंतु त्यात सरपंचाच्या किंवा उप सरपंचाच्या निवडणुकीचा समावेश होत नाही ;

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३.

(क) "पंचायत" या शब्दास, पंचायत अधिनियमान्वये त्यास नेमून दिलेलाच अर्थ असेल ;

(ड) "पंचायत अधिनियम' म्हणजे, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

विवक्षित निवडणुका लांबणीवर टाकणे आणि सदस्यांचा व प्रशासकांचा पदावधी वाढवणे.

३. पंचायत अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही नियम किंवा उप-विधी किंवा महाराष्ट्र ग्राम-पंचायती (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून, दिनांक ३१ मे १९७८ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंतच्या किंवा राज्य शासन कलम १, पोट-कलम (३) अन्वये विनिर्दिष्ट करील अशा आधीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीमध्ये (या अधिनियमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त कालावधी" असा करण्यात आला आहे) कोणत्याही पंचायतीच्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुका, तसेच कोणत्याही पंचायतीमधील कोणतेही नैमित्तिक रिकामे पद भरण्यासाठी कोणतीही पोट-निवडणूक घेण्यात येणार नाही ;

(ब) जे या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी पदावर असतील (मग त्यांचा पदावधी उक्त तारखेपूर्वी संपलेला असो किंवा त्या तारखेला किंवा त्या तारखेनंतर उक्त कालावधीमध्ये केव्हाही संपणार असो) असे, कोणत्याही पंचायतीचे (निवडून आलेले किंवा नियुक्त केलेले) सदस्य किंवा कोणत्याही पंचायतीचा प्रशासक किंवा कोणत्याही पंचायतीचे प्रशासक यांचा पदावधी (कोणत्याही वाढविलेल्या पदावधीसह) वाढविण्यात आला असल्याचे किंवा यथास्थिती, वाढवावयाचा असल्याचे मानण्यात येईल ; आणि असा प्रत्येक सदस्य किंवा प्रशासक उक्त कालावधीमध्ये पद धारण करण्याचे चालू ठेवील :

परंतु, या कलमाद्वारे अशा रीतीने वाढवण्यात आलेला सदस्यांचा किंवा प्रशासकांचा पदावधी संपल्यानंतर, ते पुनर्रचित पंचायतीच्या ज्या सभेत गणपूर्ती झाली असेल अशा पहिल्या सभेपर्यंत पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

ज्यांचा पदावधी वाढविलेला आहे अशा सदस्यांच्या व प्रशासकांच्या शक्ती आणि विवक्षित कृती विधिग्राह्य ठरवणे.

४. लगतपूर्ववर्ती कलमान्वये ज्यांचा पदावधी वाढवण्यात आल्याचे मानण्यात आले आहे किंवा यथास्थिती वाढवण्यात आला आहे असे, पंचायतीचे सर्व सदस्य आणि पंचायतीचे सर्व प्रशासक वाढवलेल्या कालावधीत देखील (मग तो या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा नंतर वाढविलेला असो) असे सदस्य म्हणून किंवा यथास्थिती प्रशासक म्हणून सर्व शक्तींचा वापर करण्यास व सर्व कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल व सक्षम असतील, आणि पदावधी वेळेवर वाढविण्यात आला नव्हता, किंवा तो अन्यथा योग्य रीतीने वाढविण्यात आला नव्हता, किंवा वाढविलेल्या कालावधीमध्ये त्या पंचायत सदस्याला किंवा प्रशासकाला पंचायत सदस्याच्या किंवा यथास्थिती प्रशासकाच्या शक्ती वापरता येत नव्हत्या आणि त्याची सर्व कर्तव्ये व कार्ये पार पाडता येत नव्हती याच केवळ कारणास्तव, अशा कोणत्याही सदस्याने किंवा प्रशासकाने उक्त कालावधीमध्ये केलेली कोणतीही कृती अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही किंवा त्या बाबतीत कोणत्याही न्यायालयात हरकत घेण्यात येणार नाही.

विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांची वाढवलेली मुदत संपल्या-नंतर नवीन पंचायतींची स्थापना करण्यासाठी करावयाची व्यवस्था.

५. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करावयाच्या (उक्त कालावधी संपण्यापूर्वीची तारीख असलेल्या) तारखेनंतर, जिल्हाधिकारी व इतर संबंधित अधिकारी हे, पंचायत अधिनियम, व तदन्वये केलेले नियम आणि उप-विधी यांच्या उपबंधानुसार, नवीन पंचायती स्थापन करण्यासाठी, विद्यमान पंचायती, सदस्य व प्रशासक यांची या अधिनियमाद्वारे वाढवण्यात आलेला पदावधी किंवा त्यानंतर शक्य तेवढ्या लवकर, व्यवस्था करतील.

१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ लागू होणे.

६. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा, उपबंधित केले असेल ते खेरीजकरून, पंचायत अधिनियम इतर सर्व बाबतीत संबंधित पंचायतींना लागू होईल.

अडचणी दूर करणे.

७. या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधांची अंमलबजावणी करताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा पंचायत अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास राज्य शासनास, प्रसंग पडेल त्याप्रमाणे, अडचणी दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८ याचे निरसन.

८. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस, महाराष्ट्र ग्रामपंचायती (आणीबाणीच्या कालावधीत निवडणुका लांबणीवर टाकणे) अधिनियम, १९७५ हा निरसित होईल. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८.

१९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

९. (१) महाराष्ट्र ग्रामपंचायती (यानंतर लवकरच घेण्यात यावयाच्या राज्य विधानसभेच्या, जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, निवडणुका लांबणीवर टाकणे) अध्यादेश, १९७७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेसह किंवा दिलेल्या कोणत्याही आदेशासह) ही, या अधिनयमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आली असल्याचे किंवा काढण्यात आली असल्याचे किंवा यथास्थिती देण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

**य. शं. कानिटकर,**
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.